महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

**सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५**

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

---

**क्र. पी.आर-३/सबसिडी/३७८२८** **दिनांक :२०.१२.२०१४.**

## वाणिज्य परिपत्रक क्र.२३५

**विषय :-** सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील सुधारीत हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी घोषित केलेल्या दुष्काळग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना :-

१) जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर -२०१४ या त्रैमासिक वीज बिलात सुट देण्याबाबत

२) दुष्काळग्रस्त जाहिर केलेल्या गावांतील कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. एससीवाय २०१४/प्र.क्र. २०१/म-७ दिनांक १९/०८/२०१४.

२) वाणिज्य परिपत्रक क्र. २२७ दि.५.९.२०१४.

३) शासन निर्णय क्र. एससीवाय २०१४/प्र.क्र. २०१/म-७ दिनांक २५/०८/२०१४.

४) शासन निर्णय क्र. एससीवाय २०१४/प्र.क्र. २३१/म-७ दिनांक २५/११/२०१४.

५) वाणिज्य परिपत्रक क्र. २३३ दि.०४.१२.२०१४.

६) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४० (शिकाना)/ऊर्जा-५, दि.१९.१२.२०१४.

शासनाने संदर्भातील शासन निर्णय दि. १९.०८.२०१४ व २५.०८.२०१४ अधिक्रमित करुन संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१४-१५ च्या खरीप हंगामातील पिकांची सुधारीत हंगामी पैसेवारी जाहीर केलेली आहे. सदर संदर्भिय शासन निर्णय क्र. ४ नुसार टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या १९०५९ गावांतील कृषी ग्राहकांना खालीलप्रमाणे सवलती लागू करण्याबाबत वाणिज्य परिपत्रक क्र.२३३ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देशित करण्यात आले होते.

१) टंचाईसदृश्य गावातील कृषी ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५टक्के सुट देण्यात यावी.

२) टंचाईसदृश्य गावातील कृषी पंपाची विज जोडणी खंडीत करण्यात येऊ नये.

शासनाने संदर्भ क्र.६ मधील शासन निर्णयाद्वारे दुष्काळग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर -२०१४ या त्रैमासिक वीज बिलामध्ये माफी देण्याचा सुधारित निर्णय घेतलेला आहे. सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर -२०१४ या त्रैमासिकाची वीज देयके माफ करण्यात यावीत. सप्टेंबर-२०१४ चे त्रैमासिक वीज बिल यापुर्वीच निर्गमित झालेले असल्यास सदर सवलत पुढील त्रैमासिक वीज बिलात समायोजित करण्यात यावी. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून वरील शासन निर्णयाप्रमाणे वीज देयके वितरीत करण्यात यावी.

शासन आदेशाप्रमाणे दुष्काळग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर-२०१४ या त्रैमासिकाची वीज बिले माफ करण्यात आल्यावर शासनावर पडणा-या आर्थिक भाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ (महावितरण)

२) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात दुष्काळग्रस्त गावांतील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर-२०१४ ची वीज बिले शुन्य रक्कमेची आकारल्यानंतर वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक भाराची परिमंडळ व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्ततः करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.

३) मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक वित्त), महावितरण, मुंबई.